आर्थिक साक्षरता सप्ताह
5 ते 9 जून 2017

जाणून घ्या बँक आणि बँकींग लोकपालाकडे आपल्या तक्रारी कशा नोंदवायच्या.

एका ग्राहकाच्या दृष्टीने, जर तुम्ही तुमच्या दैनंदिन बँकींग सेवा जशा की एटीएम मशीनमधून पैसे न निघणे, पूर्व सूचना न देता जबरदस्तीने शुल्क आकारणे, क्रेडिट कार्डाशी संबंधित समस्या, इत्यादींना तोंड देत असाल तर तुम्ही तुमच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी बँक अधिका-याशी संपर्क साधावा. जर समस्येचे निराकरण झाले नाही, तर तुमच्या तक्रारीच्या निवारणासाठी खालील प्रक्रियेचे अनुसरण करा.



1. आपल्या बँकेच्या शाखेची तक्रार, तक्रार रजिस्टरमध्ये नोंदवा. जर उपलब्ध नसेल, तर त्याबद्दल विचारा किंवा बँकेच्या वेब साईटवर ऑनलाईन तक्रार करा.

2. अशा अधिकाऱ्यांची नावे विचारा जे तुमच्या तक्रारीचे निवारण करू शकतात. जरी त्यांची नावे बँकेच्या शाखेत दर्शनीय नसतील तरी, बँकेकडे तक्रार निवारणार्थ एक अधिकारी असतो.

3. जर आपल्या बँकेकडून एक महिन्याच्या आत तक्रारीचे निराकरण झाले नाही तर, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँकींग लोकपालाशी संपर्क साधावा. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग लोकपाल योजनेत आपल्या तक्रारीचे त्वरेने आणि मोफत निराकरण होते. बँकींग लोकपाल बँकींग सेवांमधील बऱ्याच त्रुटींचे / कमतरतेचे अंतर्भाव करते.

4. फक्त साध्या कागदावर लिहा किंवा ई-मेल पाठवा. बँकिंग लोकपाल कार्यालयांच्या पत्यांसाठी आणि ई-मेल आयडी साठी आपण https://bankingombudsman.rbi.org.in मध्ये लॉग इन करा आणि मग “Addresses of Banking Ombudsman” वर क्लिक करा.

5. ऑनलाईन तक्रार दाखल करण्यासाठी भेट द्या. https://bankingombudsman.rbi.org.in आणि नंतर “Complaint Form” वर क्लिक करा.

तपशीलवार माहितीसाठी https://bankingombudsman.rbi.org.in ला भेट द्या.

Design: Anupam Sharma01/17-05

आर्थिक साक्षरता • समृद्धीचा मार्ग

BO

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in